# महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मीत्रा)

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)


महसुल आयुक्त कार्यालयासमोर
आय.एस.पी.रोड,नाशिकरोड,
नाशिक-४२२ १०१ (महाराष्ट्र)
फोन: (०२५३) २४६२५१२
Email- senrtc@gmail.com


जा.क्र.मित्रा/लेखा/ ९८०८ /२०२३ दिनांक :- ८/९/२०२३

## दरपत्रक सुचना सन २०२३-२४

प्रति,

-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

**विषय** : मित्रा प्रशिक्षण संस्थेकरिता वसतीगृह व्यवस्थापक पद भरणेबाबत.

महोदय,

संचालक, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मित्रा), नाशिकरोड, नाशिक या कार्यालयाअंतर्गत असलेली कामे पार पाडण्यासाठी, वसतीगृह व्यवस्थापक पद भरण्यासाठी दि. /०९/२०२३ रोजी ठिक १४.०० वाजेपर्यंत सिलबंद दरपत्रके खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मागविण्यात येत आहे. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी. दरपत्रके शक्य झाल्यास त्याच दिवशी १६.०० वाजता उघडण्यात येतील.

| अ.क्र. | तपशिल | मासिक मानधन (रुपयात) |
|---|---|---|
| १ | मित्रा प्रशिक्षण संस्थेकरिता वसतीगृह व्यवस्थापक पद भरणेबाबत. | |

**कामकाजाचे स्वरुप, कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-**

१) प्रशिक्षणाच्या अनुषंगाने प्रशिक्षणार्थ्यांची नोंदणी, वसतीगृहातील खोल्यांचे वितरण करणे
२) शासकीय प्रशिक्षणांव्यतिरिक्त इतर कार्यक्रमांसाठी शासकीय प्रशिक्षणांचा आढावा घेऊन वसतीगृहातील खोल्यांचे वितरण करणे
३) प्रशिक्षण वर्ग, कॉन्फरन्स हॉल, कॅन्टीन, संगणक कक्ष आणि सभागृह इत्यादी नियंत्रण व नियोजन
४) परिसर स्वच्छता सेवा पुरवठादार यांचे कामाबाबत नियंत्रण व नियोजन
५) धुलाई सेवा पुरवठादार यांचे कामाबाबत नियंत्रण व नियोजन
६) सुरक्षा रक्षक सेवा पुरवठादार यांचे कामाबाबत नियंत्रण व नियोजन
७) संगणक/सीसीटीव्ही देखभाल दुरुस्ती सेवा पुरवठादार यांचे कामाबाबत नियंत्रण व नियोजन
८) लिफ्ट देखभाल दुरुस्ती सेवा पुरवठादार यांचे कामाबाबत नियंत्रण व नियोजन

९) विद्युत संयंत्र / वातानुकूलित यंत्रणा / अग्निप्रतिबंधक यंत्रणा सेवा पुरवठादार यांचे कामाबाबत नियंत्रण व नियोजन

१०) मित्रा प्रशिक्षण संस्थेत असलेले विविध क्षमतेच्या जनरेटरचे नियंत्रण

११) प्रशिक्षणार्थ्यांच्या भोजनाचे, तसेच भोजन सेवा पुरवठादार यांचे कामाबाबत नियंत्रण व नियोजन

१२) वाचनालय, मनोरंजन, ग्रीन जिम, गार्डन इत्यादींची सुसज्ज व्यवस्था पाहणे, तसेच सोलर पॅनलची, स्वच्छता सेवा पुरवठादाराकडून स्वच्छता करुन घेऊन देखरेख ठेवणे.

१३) वसतीगृह व्यवस्थापनामध्ये समाविष्ट सर्व सेवा पुरवठादार यांचे नियंत्रण व नियोजन. तसेच त्यांचे मुल्यामपन अहवाल मित्रा संस्थेच्या जबाबदार अधिकाऱ्यांना प्रतिमाह सादर करणे.

१४) देखभाल दुरुस्तीस्तव व मित्रा संस्थेच्या जबाबदार अधिकारी यांना अहवाल सादर करुन साहित्य मागणी करणे.

१५) व्यवस्थानांतर्गत उपलब्ध असणाऱ्या सर्व प्रकारच्या साहित्याची, तसेच वेळोवेळी उपलब्ध झालेल्या सर्व साहित्याची नोंद व वितरण यांची रितसर नोंद ठेवणे.

१६) शासकीय प्रशिक्षणाव्यतिरिक्त इतर संस्थांसाठी आयोजित केलेल्या प्रशिक्षण / कार्यक्रमासाठीचे देयकांची वसुलीसाठी पाठपुरावा करणे

१७) उपसंचालक तथा कार्यकारी अभियंता, तसेच उपअभियंता (प्रशिक्षण / प्रशासन) यांचेशी समन्वय ठेवून, व्यवस्थापनाचा दर्जा उत्तम ठेवणे व नियोजन करणे.

१८) मित्रा संस्थेस वेळोवेळी भेट देणाऱ्या अतिमहत्वाच्या व्यक्तींबाबतचे व्यवस्थापन पार पाडणे.

१९) संचालक तथा अधीक्षक अभियंता आणि उपसंचालक तथा कार्यकारी अभियंता यांनी वेळोवेळी दिलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणे.

दर नमुद करतांना वर उल्लेखिलेल्या कामाचे स्वरुप काळजीपुर्वक वाचून मासिक मानधन नमुद करण्यात यावे.

**शैक्षणिक पात्रता :-**

१) वसतीगृह व्यवस्थापन अथवा मोठ्या हॉटेल / रिसॉर्टमध्ये अशा स्वरुपाचे काम केलेले असणे आवश्यक आहे.

२) कोणत्याही विषयातील पदवीधर

३) या क्षेत्रातील किमान ५ वर्षाचा अनुभव

४) उमेदवाराने सोबत जोडलेला विहीत नमुन्यातील अर्ज पुर्णपणे भरुन आवश्यक त्या कागदपत्रांसह दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक राहील.

**अटी व शर्ती :-**

१) कोणत्याही वादविवादाबाबत संचालक, मित्रा, नाशिक यांनी घेतलेला निर्णय अंतिम राहील.

२) मानधन नमुद करतांना ते सर्व कर समावेशक असावेत.

३) एक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

**(श्रीमती एस.बी.नरवाडे)**
**संचालक तथा अधीक्षक अभियंता**
मित्रा, नाशिक

**प्रत :** सुचना फलक, मित्रा, नाशिक

## मित्रा प्रशिक्षण संस्थेकरिता वसतीगृह व्यवस्थापक पद भरणेबाबत.

### प्रपत्र

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवाराचे पुर्ण नाव | |
| २ | पुर्ण पत्ता | |
| ३ | शैक्षणिक पात्रता | १)<br>२)<br>३)<br>४) |
| ४ | तांत्रिक अर्हता | |
| ५ | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ६ | आधार कार्ड क्रमांक | |
| ७ | पॅन क्रमांक | |
| ८ | अनुभव प्रमाणपत्रे | १)<br>२)<br>३)<br>४) |

**उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी**